**प्रेसनोट दि. १२.०६.२०२१**

श्री. शेखर शामराव शिंदे, वय ३९ वर्ष पोलीस नाईक ब.नं-५५४, इचंलकरंजी पोलीस ठाणे जि. कोल्हापूर रा.पुलाची शिरोली ता. हातकणंगले जि. कोल्हापूर यांचेविरूध्द २०००/- रुपये लाच मागणी केलेवरून गुन्हा दाखल सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांनी त्यांची श्री. शेखर शिंदे, पोलीस, इचंलकरंजी पोलीस ठाणे यांचे विरूध्द लाच मागणी केली असल्याबाबत तक्रार असल्याचे अॅन्टी करप्शन ब्युरो पुणे कार्यालयास कळवले होते. मा.वरीष्ठांनी दिले आदेशान्वये यातील तक्रार यांची भेट घेतली असता तक्रारदार यांनी त्यांचा तक्रारी अर्ज आमचे समक्ष हजर केला असता त्यामध्ये,

तक्रारदार यांचे मित्रांचे विरूध्द इचंलकरंजी पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये सहकार्य करतो असे सांगून श्री. शेखर शिंदे पोलीस इचंलकरंजी पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रूपये लाचेची मागणी करून चर्चेअंती लाच रक्कम कमी करून तक्रारदार यांचेकडून २०००/- रूपये स्विकारून आणखीन ३,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबत नमूद आहे.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक ०६.०५.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक श्री. शेखर शिंदे पोलीस यांनी तक्रारदार यांचे मित्रांचे विरूध्द दाखल असले गुन्हयामध्ये सहकार्य करण्यासाठी तक्रारदार यांचेकडून यापुर्वी २,०००/- रूपये घेतल्याचे व आणखीन २,०००/- रूपये घेवून येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले आहे.

त्यानंतर दि.१२.०५.२०२१ रोजी लोकसेवक श्री. शेखर शिंदे पोलीस, यांचे विरूध्द सापळा कारवाई आयोजीत केली असता लोकसेवक श्री. शेखर शिंदे पोलीस यांनी संशय आल्याने तक्रारदार यांचेकडून लाच स्विकारली नाही.

श्री. शेखर शामराव शिंदे, वय ३९ वर्ष पोलीस नाईक ब.नं-५५४, इचंलकरंजी पोलीस ठाणे जि. कोल्हापूर रा.पुलाची शिरोली ता. हातकणंगले जि. कोल्हापूर यांचे विरुध्द इचंलकरंजी पोलीस ठाणे जि. कोल्हापूर येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्री. सुहास नाडगौडा सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक तसेच पोलीस कर्मचारी, संजय संकपाळ, अविनाश सागर, संजय कलकुटगी, सलीम मकानदार, धनंजय खाडे, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, कोल्हापूर येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३१/२५४०९८९ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

४) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

५) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

६) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

Scanned by TapScanner